ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– I Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

# स्त्रीवाद: एक समाजाधिष्ठित तात्विक विवेचन

*डॉ. रीना अविनाश पितळे पुराडकर,

*सहयोगी प्राध्यापिका, रामनिरंजन झुनझुनवाला कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविदयालय (स्वायत्त), घाटकोपर, मुंबई

**सारांश :**

*स्त्रीवाद म्हणजे काय आहे आणि काय नाही, याबद्दलच्या संकल्पना स्पष्ट असल्या तर स्त्रीवादी असल्याचे अभिमानाने सांगता येईल. स्त्रियांचे आंदोलन म्हणजे पुरुषांविरुद्ध सूड उगवणे नाही. स्त्रियांना न्याय हवा आहे; पण अन्यायाचा प्रतिकार अन्यायाने करता येत नाही याची त्यांना जाणीव आहे. एका दमनचक्राचे उत्तर दुसरे दमनचक्र असू शकत नाही. स्त्रीवाद पुरुषांना दोष देत नाही, तर पुरुषसत्ताक व्यवस्थेला दोष देतो. पुरुषसत्ताक व्यवस्थेमुळे पुरुष हा स्त्रीपेक्षा श्रेष्ठ आहे, स्त्री ही खालच्या स्तरावर आहे, आणि स्त्रीला एक उपभोग्य वस्तू आहे, अशी शिकवण पुरुषांच्या मनात बिंबवली जाते. स्त्रीवाद स्त्री अणि पुरुष यांच्यातील सामाजिकभेद नाकारतो. ह्या निबंधात स्त्रीवादाचे सामाजिक, सास्कृतिक तसेच तात्विक विवेचन करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळेच स्त्रीची व्यक्ती म्हणून जडणघडण ही समाजात सापेक्ष असल्यामुळे समाजाची विचारसरणी बदलण्याची गरज आहे अणि हे झाले तरच स्त्रीपुरुष समतेवर आधरलेला समाज निर्माण होईल.*

**कीवर्ड** :: *स्त्रीवाद, समता, समानता, स्वायतता, उपभोग्य वस्तू, सामाजिक भेद, वारकरी संत*

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

स्त्रीवाद या शब्दाबद्दल अनेकांच्या मनात अनेक गैरसमज आहेत. त्यामुळे स्त्रीवादी लेखन करणाऱ्या काही स्त्रियाही आपण स्त्रीवादी नाही, असे सांगतात. स्त्रीवाद म्हणजे काय आहे आणि काय नाही, याबद्दलच्या संकल्पना स्पष्ट असल्या तर स्त्रीवादी असल्याचे अभिमानाने सांगता येईल. स्त्रियांचे आंदोलन म्हणजे पुरुषांविरुद्ध सूड उगवणे नाही. स्त्रियांना न्याय हवा आहे; पण अन्यायाचा प्रतिकार अन्यायाने करता येत नाही याची त्यांना जाणीव आहे. एका दमनचक्राचे उत्तर दुसरे दमनचक्र असू शकत नाही. स्त्रीवाद पुरुषांना दोष देत नाही, तर पुरुषसत्ताक व्यवस्थेला दोष देतो. पुरुषसत्ताक व्यवस्थेमुळे पुरुष हा स्त्रीपेक्षा श्रेष्ठ आहे, स्त्री ही खालच्या स्तरावर आहे, आणि स्त्रीला एक उपभोग्य वस्तू आहे, अशी शिकवण पुरुषांच्या मनात बिंबवली जाते. मानसशास्त्रज्ञ अणि थोर विचारवंत सिग्मुंड फ्रॉइड म्हणतात की, मानवी वर्तणुकीवर मेंदूतील सुप्त भावनांचा प्रभाव असतो अणि हाच प्रभाव आपल्याला मुलांच्या किवा पुरुषांच्या जडणघडणीत फार मोलाचा आहे. म्हणूनच मुलांच्या जडणघडणीत विशेष लक्ष दिले गेले पाहिजे आणि त्यांना लहानपणापासूनच

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– I Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

इतर लिंगाबद्दल आदर, सन्मान शिकवला गेला पाहिजे. त्यामुळे जी नविन पिढी घडेल त्ती समानतेचा आणि समतेचा पुरस्कार करणारी असेल. ह्या विचाराला स्त्रीवाद दुजोरा देतो.

दोन वर्ग, दोन देश, दोन जाती, दोन धर्म या लढायांप्रमाणे स्त्री-पुरुषातील ही लढाई नाही. कारण अशा लढाईत एकाची हार व दुसऱ्याची जीत निश्चित असते. इथे दोघांचे हितसंबंध एकच आहेत. कुटुंबातील सदस्यत्व व मुले यांच्या संदर्भात दोघांची कर्तव्ये सारखीच आहेत. म्हणून सत्तेचे हस्तांतर हा स्त्रीवादात मुद्दाच नाही. स्त्रियांना पुरुष व्हायचे नाही. त्या निसर्गाने त्यांच्यावर सोपवलेल्या जबाबदाऱ्या नाकारत नाहीत. स्त्रीवादी म्हणजे कुटुंब मोडणाऱ्या, स्वतंत्र्य म्हणजे स्वैराचार मान्य असणाऱ्या, किंवा स्वत:च्या वैवाहिक आयुष्यात नैराश्य आलेल्या स्त्रियांनी अंगीकारलेली विचारसरणी नव्हे हा स्त्रीवादाचा अपप्रचार आहे.

स्त्रिया व पुरुष यांच्यात शारीरिक भिन्नता असली तरी व्यक्ती म्हणून दोघांत समता नांदू शकते. शांततापूर्ण सहअस्तित्व व सामंजस्य अधिक महत्त्वाचे आहे. परस्परांचा सन्मान राखून व समतेच्या पायावर अधारलेल्या नात्याने हे घडू शकते. स्त्रीवाद म्हणजे पुरुषापासून फारकत घेउन स्त्रीने आपला स्वतंत्र सुभा निर्माण करणे नव्हे तर स्वतःच्या सामर्थ्याचा शोध घेऊन आपल्या विकासासाठी पुरुषांच्या बरोबरीने खांद्याला खांदा लावून जीवन जगण्याचे स्त्रीवाद समर्थन करतो, स्त्रीवाद स्त्री अणि पुरुष यांच्यातील सामाजिकभेद नाकारतो. वेबस्टर शब्दकोशानुसार 'पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना राजकीय हक्क असणे म्हणजे स्त्रीवाद होय.'

स्त्रीवाद म्हणजे केवळ स्त्री हक्कांचे समर्थन नव्हे, तर स्त्रीची 'स्त्री' अशी ओळख करून देणे. स्त्रीचे कुटुंबातील स्थान, स्वतःच्या शरीरावरील हक्क तसेच राजकीय, सामाजिक, शैक्षणिक इ. क्षेत्रात समानता अणि समता मिळविण्यासठी स्त्रियांनी केलेला संघर्ष म्हणजे स्त्रीवाद होय. या विचारसरणीचा उद्देश स्त्री पुरुष विषमतेवर असणारे जग बदलण्याचा आहे. स्त्रियांना समाजात दुय्यम स्थान देण्यामागे जे पुरुषी राजकारण आहे, त्याचा बीमोड करणे हा स्त्रीवादाचा मुख्य उद्देश आहे. स्त्रीवादांतर्गत अनेक गोष्टींचा अंतर्भाव होतो, त्यात मुख्यत्वे पुरुषां इतकेच स्त्रीलाही स्वतःचे अस्तित्व आहे, स्वतःचा-विकास, स्वतंत्रता यांची जरूरी तिलाही आहे ह्याची जाणीव समाजाला करुन देणे गरजेचे आहे असे स्त्रीवादी विचारवंताना वाटते.

स्त्रीवादी विचारांचा विकास तीन टप्प्यात विभागाला जातो. पहिल्या टप्प्यात स्त्रीविरोधी कायदे व परंपरा यांच्याविरोधी चळवळी झाल्या. दुसऱ्या टप्प्यात पुरुषांप्रमाणे स्त्रियांना सर्व नागरी व सामाजिक हक्क मिळावेत यासाठी प्रयत्न झाले. तिसऱ्या टप्प्यामध्ये स्त्री स्वातंत्र्यचा व्यक्तीकेंद्रित विचारला महत्व प्राप्त झाले. त्यामुळेच स्त्रीवादाचे स्वरूप सतत बदलत गेल्याचे दिसून येते. म्हणूनच प्रकर्षाने म्हणावेसे वाटते की स्त्रीवादाने सामाजिक आणि सांस्कृतिक लिंगाभेद नाकारला आहे आणि समता प्रस्थापित करण्याचा आटोकाट प्रयत्न केला आहे. स्त्रीवाद समाजातील सांकल्पनिक, सैद्धांतिक चौकटीमध्ये स्त्रियांना मिळणारे गौणत्व, त्यांचे केले जाणारे दमन ह्याचे स्पष्टीकरण व विश्लेषण करतो. त्याचप्रमाणे हे सामाजिक वास्तव बदलण्यासाठी काय करण्याची गरज आहे ह्याचे विवेचनही

करतो. काळानुसार, स्त्रीवादी चळवळीत अनेक बदल घडलेले दिसतात; व जहाल, मवाळ, मार्क्सवादी, पर्यावरणवादी, कृष्णवर्णीय वगैरे अशा अनेक विचारसरणींच्या बहुविध संघटना सामील झाल्याचे दिसून येते.

स्त्रीवाद हा प्रत्येक स्त्रीचा व्यक्ती म्हणून आदर अणि विचार करतो. त्यामुळे स्त्रीवाद ही जगातल्या प्रत्येक स्त्रीशी जोडली गेलेली नाळ आहे, असे गांधीजी म्हणतात. त्याचप्रमाणे स्त्रीवादी चळवळ हा फक्त स्त्रियांचा प्रश्न नसून, पुरुषांची मानसिकता बदलण्याचा तो प्रयत्न आहे.

व्यक्ती आणि समाज यांचे संबंध अत्यंत व्यामिश्र आणि गुंतागुंतीचे आहेत. व्यक्तीवर त्या कालखंडात घडणाऱ्या सामाजिक उलथापालथींचा आणि सामाजिक परंपरेचा परिणाम स्पष्ट दिसतो; अणि त्याकाळातील साहित्य समाजातील विकृतींवर नेमकेपणाने प्रहार करून सामाजिक बदलाचे भान देतात. 'आहे ते जग समताधिष्ठित, स्वस्थ व सुंदर व्हावे' या सामाजिक जाणिवेतून लढत राहतात अणि प्रस्थापित समाजरचनेच्या विरोधात उभे राहून स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या हक्कांची पुनस्थापना करण्याच्या हेतूने प्रेरित होऊन स्त्रीवादी चळवळीना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रित्या हातभार लावतात. मग ते संत साहित्य असो किंवा समकालीन साहित्य असो. स्त्रीवादाला अपेक्षित असलेला भगिनीभाव देश, काल, जाती, धर्म, वर्ग यांच्या पलीकडे निर्देश करतो. स्त्रियांचे भावनिक, मानसिक, नैतिक, आर्थिक, भाषिक आणि अस्मितेसंबंधीचे प्रश्न जगात सगळीकडे सामान आहेत.

स्त्रीमुक्ती चळवळींच्या माध्यमातून स्त्रियांसंबंधीचे शतकानुशतके दडपले गेलेले प्रश्न पृष्ठभागावर येऊ लागले. स्त्रीमुक्ती, स्त्री-स्वातंत्र्य, स्त्रीवाद वगैरे पारिभाषिक संकल्पना याच काळात रूढ झाल्या. पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत स्त्रियांना दुय्यम-तिय्यम दर्जाचे स्थान दिल्याने आणि रूढ समाजव्यवस्थेत धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक, भाषिक, बौद्धिक अशा सर्व व्यवस्था स्त्रियांचे शोषण करतात याची जाणीव झाल्याने, त्या व्यवस्थेविरोधात बंड करण्याच्या उद्देशाने स्त्रीमुक्ती चळवळ अस्तित्वात आली. स्त्रीचे माणूसपण नाकारून तिला जी पशुतुल्य स्थिती प्राप्त करून दिली गेली, त्याविरुद्ध लढा देत व्यक्ती म्हणून स्त्रीचे असलेले स्थान प्रस्थापित करण्यासाठी विकसित झालेला 'स्त्रीवाद' ही एक विचारप्रणाली आहे. स्त्रियांना क्षमताधिष्ठित हक्क प्राप्त करून समाजपरिवर्तन घडवू बघणारी ही एक राजकीय, सामाजिक आणि तात्विक जाणीव आहे.

स्त्रीवादाची चळवळ उभी राहिली, ती समाजपरंपरेतील स्त्रीप्रतिमा सुधारण्यासाठी स्त्रियांनी त्यांचे अस्तित्व मर्यादित करणाऱ्या स्त्रीत्वाच्या रूढ व्याख्या नाकाराव्यात ह्यासाठी. स्त्री ही माणूस असून, तिचा व्यक्ती म्हणून विचार होणे समाजात गरजेचे आहे. होण्याची. पुरुषप्रधान व्यवस्थेत लिंग भेदभाव मुद्दाम घडविला गेला आहे. पितृसत्ताक पद्धतीची विचारसरणी ही श्रेणीबद्ध, द्वंद्ववादी आणि वर्चस्ववादी स्वरुपाची आहे. तीत स्त्रियांचे शोषण झाले आहे आणि होतही आहे.

'मानव म्हणजे पुरुष, तर स्त्री हे त्याचे उपांग' या पारंपरिक विचारसरणीला प्रश्न करत स्त्रीवादी चळवळ घडत गेली आणि स्त्रियांच्या हक्कांचे व अधिकारांचे विविध अंगांनी समर्थन करत त्याचा प्रवास झाला. या चळवळीच्या माध्यमातून स्त्रियांनी पुरुषप्रधान

मानसिकतेला जगभर धक्के देत आपले न्याय हक्क मिळवण्याचा प्रयत्न केला आहे. स्त्रीवादी सिद्धान्ताने कालानुरुप बदल केले आहेत; तसेच धार्मिक समजुती, जातीय परंपरा, व्यक्तीची जडणघडण, मानसिकता, लैंगिकता, शिक्षण, संस्कार यानुसारदेखील स्त्रीवादाचे स्वरूप बदलत गेले आहे. मात्र, स्त्रीवादाचा गाभा स्त्री- पुरुष समता हाच आहे आणि तो देश-काल यांच्या पलीकडे एकच आहे. स्त्रीवादी विचारसरणीचा जन्म अनेक धार्मिक, सामाजिक, राजकीय अन्यायांमुळे झाला; त्यात तिला कायमच दुय्यम दर्जाची वागणूक दिली गेली.

'स्त्रीभोवती एक गूढ वलय आहे. स्त्रियांच्या वर्तनाचं तार्किक स्पष्टीकरण देता येत नाही. स्त्री ही लहरी आहे. स्त्री हे कोडे आहे..' अशा स्वरूपाची विधाने बऱ्याच विचारवंतानी केली आहेत. फ्रॉइडलाही स्त्री ही पुरुषापेक्षा अधिक गूढ वाटते. 'स्त्रीला काय हवे आहे, याचे उत्तर माझ्या तीस वर्षांच्या संशोधनानंतरही मी देऊ शकलो नाही, अशी कबुली त्याने दिली आहे. मात्र स्त्री-स्वभावाविषयीचे अस्पष्टीकरणात्मक वर्णन ही पुरुषांची एक खेळी आहे, असे सिमॉन दी बुवाला वाटते. स्त्रीस्वभावाबद्दलचे अज्ञान मान्य न करता गूढ वलय निर्माण करणे, म्हणजे स्त्रीस्वभाव समजून न घेणे आहे. तो कळला, तर पुरुषाचा भ्रमनिरास होईल आणि वास्तव कळून येईल, की स्त्री जशी एकटी आहे, तसा तोही एकटा आहे. स्वत:ची स्वप्ने, आशा-आकांक्षा, भीती, प्रेम, पोकळ गर्व या सर्व बाबतींत तो एकाकी आहे. जोपर्यंत स्त्रीला समजून घेतले जात नाही, तोपर्यंत तिच्याशी परिपूर्ण संबंध जोडले जाणे अशक्य आहे.

मानसशास्त्रानुसार एकाच समान परिस्थितीत स्त्री व पुरुषांच्या प्रतिक्रिया सारख्याच असतात त्यात लिंगसापेक्ष फरक पडत नाही. तरी प्रत्येक गोष्टीचे मूल्यमापन साम्यावर न करता भेदांवर आधारित करण्याची एकूण वृत्ती दिसते. या भेदास सामाजिक घटक कारणीभूत आहेत. पुरुषांच्या हाती सर्व प्रकारची सत्ता आहे. सत्तेमुळे पैसा, श्रेष्ठत्व, पुढारीपण मिळते. दुसऱ्यांच्या वर्तनावर नियंत्रण ठेवता येते. सत्ता म्हणजेच वर्चस्व व स्वामित्व गाजवणे. पुरुष सत्ताधीश आहे आणि स्त्रीकडे काहीही नाही. स्त्रियांच्या अस्तित्वावरच सतत नियंत्रण येत असल्यामुळे अनुभव, भावना, विचार, प्राधान्य कल्पना यांत फरक पडू शकतो. लिंगभेदामुळे पडणाऱ्या फरकांचा स्त्रियांच्या चळवळीने पुनश्च अभ्यास केला. त्यामध्ये पुरुष हाच मापदंड धरून त्यावरून तुलनेने स्त्रीचे मोजमाप करायचे आणि त्यावरून स्त्रीमध्ये असलेला फरक ही तिची कमतरता व कमकुवतपणा मानायचा, असे आढळून आले. जे जे काही पुरुषांचे आहे ते सर्वोत्कृष्ट आहे; जे स्त्रीचे आहे ते दुय्यम आहे, मुले व मुली यांना अशा रीतीने वाढवले जाते असे मत कैरोल गिलिगन आपल्या देखभालीची नैतिकता ह्या सिद्धांतात स्पष्ट करते अणि म्हणूनच ह्यात बदल अत्यावश्यक आहे ह्याचा पुनरुच्चार करते.

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात स्त्री-सुधारणावादी महिला अधिक आक्रमक झाल्या. त्यांनी स्त्रियांचे दमन हे ऐतिहासिक दृष्ट्या पाहिले आणि त्याचे परिणाम दूरगामी होत आहेत, त्यासाठी हा सिद्धांत प्रतिपादित केला. स्त्रीवादी विचारवंतंनी पुनरुत्पादन, मातृत्व, लैंगिकता यांसंबंधी अनेक महत्त्वाचे प्रश्न उपस्थित केले. त्याचप्रमाणे पितृसत्ताक कुटुंबपद्धतीत रुजलेल्या सत्ता, स्पर्धा, श्रेणीबद्धता, वर्चस्ववाद यांचा समूळ नाश होण्याची गरज प्रतिपादित केली. जे जे व्यक्तिगत ते ते राजकीय अशी घोषणा करताना स्त्रियांच्या सजग जाणीवेवर

भर दिला दिसतो. स्त्री आणि पुरुष यांच्या विकासाच्या दोन वेगळ्या प्रक्रिया न मानता दोहोंच्या विकासाच्या दृष्टीने एक सामायिक विचार व्हावा, हा मनोविश्लेषणवादी सिद्धांत मांडला.

फ्रेंच स्त्रीवादी लेखिका सिमाँ द बोवा यांनी 'दि सेकंड सेक्स' (१९४९) या ग्रंथातून स्त्रीस्वातंत्र्याचा पुरस्कार केला आहे. तिने सेक्स अणि जेंडर या दोन शब्दातील अंतर स्पष्ट केले आहे. परंतु तिच्या मते, स्त्री अणि पुरुष यांच्यात केवळ जैविक लिंगभेद नैसर्गिक आहे. म्हणूनच सामाजिक लिंगभेद नष्ट करून स्त्रीला माणूस म्हणून वागणूक देणे गरजेचे आहे. स्त्रीत्व केवळ जैविक नसून ते समाजात घडविले जाते असे मत सिमोन द बोवानी व्यक्त केले आहे. पुरुषप्रधान समाजाने निर्माण केलेल्या मूल्याव्यवस्थेत स्त्रीला व्यक्ती म्हणून स्थानच दिलेले नाही. त्यामुळे अशा समाजाची बंधने झुगारुन स्त्रीयांनी स्वातंत्र्य मिळविले पाहिजे असे ती मानते. सीमॉन द बोवाने स्त्रीच्या दमनाचे अस्तित्ववादी स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न केला आहे. स्त्रीला 'अन्य' किंवा 'इतर', विशेषतः 'पुरुषेतर' मानले गेल्यामुळे ती स्वतंत्र, स्वनियंत्रित राहिली नाही. तिच्या अस्तित्वाला ती स्वतः अर्थ देऊ शकत नाही; तर तो तिच्यासाठी स्त्रीत्वाच्या साराच्या संदर्भात ठरवला जातो असे तिचे म्हणणे आहे.

अलीकडील काळातील उत्तर आधुनिकता स्त्रीवाद, कृष्णवर्णी स्त्रीवाद, बहुसांस्कृतिक आणि वैश्विक स्त्रीवादावरभाष्य करतो. यांपैकी कृष्णवर्णी स्त्रीवादाने स्त्रीवादाच्या मुख्यधारेच्या मर्यादा स्पष्ट करताना वर्णवर्चस्ववादाशी निगडित असे अनेक प्रश्न स्त्रीवादाच्या संदर्भात अधोरेखित केले आहेत. स्त्रीवादाच्या कक्षा श्वेतवर्णीय, मध्यमवर्गीय आणि भिन्नलिंगी तसेच समलिंगी संबंध असणाऱ्या स्त्रियांच्या प्रश्नांना अणि त्यापलीकडील प्रश्नापर्यंत विस्तारण्याची आवश्यकता त्यातून प्रकर्षाने पुढे आली. स्त्रीवादाचा निरनिराळ्या सिद्धांतांमधून आणि त्यांच्या परस्परसंबंधांमधून जो विकास घडला, त्यामध्ये स्त्रीच्या गौणत्वाला कारणीभूत ठरणाऱ्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय, मानसशास्त्रीय घटकांचा सखोल विचार होणे गरजेचे आहे ह्याची जाणीव झाली. त्यामुळेच स्त्रीत्वाची काही सार्वत्रिक, सार्वकालिक व्याख्या करणे कितपत योग्य ह्याचा विचार करणे महत्त्वाचे आहे. स्त्रीवादाने स्त्रीचे दास्यत्व किंवा दैवत्व नाकारून तिचा माणूस म्हणून ओळख निर्माण करण्याचा सतत प्रयत्न केला अणि त्याचे पुनर्मूल्यांकन केले. कारण या विचारसरणीला मानववादाचे अणि समतावादाचे अधिष्ठान आहे. एकूणच स्त्रीवादी तत्वज्ञान स्त्रीच्या व्यक्तित्वाचा, मानसन्मान, सर्व प्रकारची स्वातंत्र्ये आणि समानता याचा पुरस्कार करते. स्त्री प्रश्नांचे सैद्धांतिक आणि व्यावहारिक पातळ्यांवर वर्ण, वर्ग, जात इत्यादींशी जे गुंतागुंतीचे संबंध आहे त्याचा ही विचार स्त्रीवादात होताना दिसतो. त्यामुळे स्त्रीमुक्तीचा लढा हा सर्व शोषित, वंचित मानवसमूहांच्या मुक्तीच्या लढ्यांपासून वेगळा काढता येऊ शकत नाही, याचे एक सुजाण अणि सजग भान या सर्व चर्चेमधून निर्माण होते. स्त्रीवादी विचारसरणी फक्त पाश्चात्य नव्हे तर संतानी अणि इतर महान नेत्यांनी जसे की महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, गोपाळ कृष्ण आगरकर, महात्मा गांधी आदींनी शतकापूर्वीपासून स्त्री-पुरुष समता व स्त्रीचे स्वातंत्र्य याबद्दल अतिशय उदारमतवादी विचारांची मांडणी केली आहे. ती आपण आचरणात आणली नाही, एवढेच. महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायातील स्त्रीसंतांनी स्त्रियांच्या समतेचा, समानतेचा

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– I Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

आणि व्यक्तित्वाचा विचार आपल्या अभंगातून सतत मांडला आहे. संत जनाबाई म्हणतात,

‘स्त्री जन्म म्हणुनी न व्हावें उदास । साधुसंतां ऐसें केलें जनीं ॥‘

‘डोईचा पदर आला खांद्यावरी । भरल्या बाजारीं जाईन मी ॥१॥

हातीं घेईन टाळ खांद्यावरी वीणा । आतां मज मना कोण करी ॥२॥

पंढरीच्या पेठे मांडियेले पाल । मनगटावर तेल घाला तुह्मी ॥३॥

जनी म्हणे देवा मी झालें येसवा । निघालें केशवा घर तुझें ॥४॥‘

संत जनाबाईंचे अभंग आक्रमक आणि बंडखोर स्त्रीवादाचा पुरस्कार करताना दिसतात. तसेच इतरही संत कवियत्रिंचे अभंग स्त्रीवादाचा पुरस्कार करताना दिसतात. संत सोयराबाई स्त्रीच्या सन्मानासाठी समाजाशी झगडते वेळ पडलीतर देवशी ही भांडते.

‘हीन मी काय वानू देवा| तुम्ही केशवा उदार||’

‘देहासी विटाळ म्हणती सकळ| आत्मा तो निर्मळ सुद्ध बुद्ध’||’

संत कान्होपात्रा देखील स्त्रीवादाचा पुरस्कार करताना आढळतात. ह्या सर्व स्त्री संतांचे अभंग स्वत्वाची, स्वायत्तता, अणि स्वयंनिर्णयाची आठवण आणि ओळख करुन देतात तसेच स्त्री ही एक व्यक्ती म्हणून परिपक्व आहे ह्याची जाणीव देखील करुन देतात. इथे आंबेडकरांची आठवण होते त्यांच्या मते, कोणत्याही समाजाची प्रगती ही त्या समाजातील स्त्रियांच्या प्रगतीवर अवलंबून असते. स्त्रीवादाचा साकल्याने विचार केल्यास, स्त्री स्वातंत्र्य, स्त्री-पुरुष समता व आत्मनिर्भरता या गोष्टी स्त्री उद्धारासाठी अपरिहार्य ठरतात आणि त्यामुळेच स्त्रीची व्यक्ती म्हणून जडणघडण ही समाजात सापेक्ष असल्यामुळे समाजाची विचारसरणी बदलण्याची गरज आहे अणि हे झाले तरच स्त्रीपुरुष समतेवर आधरलेला समाज निर्माण होईल.

**संदर्भ :**


- Hooks, Bell, Feminist Theory: From Margin to Center, New York, 2000.
- Nicholson, Linda, Ed. The Second Wave, London, 1997
- 3.https://ia600307.us.archive.org/13/items/1949SimoneDeBeauvoirTheSecondSex/1949_simone-de-beauvoir-the-second-sex.pdf
- **"समाज, स्त्रीवाद आणि स्त्रीवादी साहित्य".** loksatta.com (Marathi भाषेत). 24 January 2016.
- "स्त्रीवाद :समज-गैरसमजांच्या पलीकडे..."divyamarathi.bhaskar.com (Marathi भाषेत),18 October 2022. Archived from the original on 18 October 2022.
- "स्त्रीवाद" (PDF). unishivaji.ac.in (Marathi भाषेत).18 October 2022. Archived (PDF)from the original.


**Cite This Article:**

*डॉ. रीना अविनाश पितळे पुराडकर, (2022)* स्त्रीवाद: एक समाजाधिष्ठित तात्विक विवेचन, ***Electronic International Interdisciplinary Research Journal,*** *Volume No XI (Special Issue-I), 138-143.*